जळगाव दि.२७ ( प्रतिनिधी) :- आजच्या तरूण पिढीने सातपुडा व सह्याद्रीच्या परिसरातील वनसंपदेचे रक्षक व्हावे व या वनसंपदेच्या संवर्धन व संरक्षणाची जबाबदारी स्वीकारावी असे आवाहन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित आदिवासी अकादमी, नंदुरबार आणि पर्यावरण विज्ञान आणि निसर्ग संवर्धन शाळा, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ मार्च २०२६ रोजी " व्दिदिवसीय जैवविविधता महोत्सव – २०२६" चे उद्घाटन करतांना धुळे सर्कलच्या मुख्य वनसंरक्षक नीनू सोमराज यांनी केले.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी, यावल येथील उपवनसंरक्षक सौरीष सहाय, जुही पेठे (प्रोजेक्ट हेड, रिसर्च इन एन्व्हायर्नमेंट, एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट सोसायटी, नाशिक), राज्यपाल नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य व नियोजन समिती अध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, कार्यकारी अध्यक्ष नितीन झाल्टे, महोत्सवा समन्वयक प्रा. के.एफ. पवार हे उपस्थित होते.

पुढे बोलतांना नीनू सोमराज यांनी सांगितले की, झाडे लावणे, वनांचे संरक्षण व संवर्धन करणे हे केवळ पृथ्वी वाचवण्यासाठी नसून मानवांच्या अस्तीत्वासाठी आवश्यक आहेत. त्याकरीता सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. वनसंपदे कडून मानवाला आरोग्य तर मिळतेच मात्र दुर्मिळ वनसंपदा, सुक्ष्म बॅक्टीरीया, बीज या पासून उत्पन्न देखील मिळते. आजची पिढी जरी एआय मधील असली तरी कोणतेही तंत्रज्ञान झाडांची झटपट वाढ करू शकत नाही. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, मानव जंगले कमी करत असल्यामुळे जंगलातील जैव विविधता उदा. बिबट्या वगैरे प्राणी गाववस्तीकडे येत आहे. त्यामुळे वनांचे संरक्षण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरू प्रा. व्ही.एल माहेश्वरी यांनी सांगितले की, मानवाचे अस्तित्व वन जंगलांवर अवलंबून आहे. यांच्यापासून अन्न, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध होत आहेत. आजच्या पिढीने प्लॅस्टीकचा वापर कमी करून जैवविविधता व वनसंपदेचे संरक्षण करावे. असे सांगून विद्यापीठाने विद्यार्थ्याकरीता वनसंवर्धनासाठी पुढाकार घेणे संबंधी योजनांचा तपशील सांगितला.

प्रास्ताविक करतांना व्य.प.सदस्य राजु नन्नवरे यांनी सातपुडा–खानदेश प्रदेशातील समृद्ध जैवविविधता, आदिवासी समाजाचे पारंपरिक पर्यावरणीय ज्ञान आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध अधोरेखित केले व जैवविविधतेचे संवर्धन व संरक्षण आवश्यक असल्याचे सांगितले. सुरुवातीस सातपुडा व खानदेशातील जैवविविधतेवरील प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या समारंभात विद्यापीठ परिसरातील जैवविविधता बाबत वन्यजीव संरक्षण संस्था यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या समारंभात सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थिनी सन्मान योजना अंतर्गत संलग्नित महाविद्यालयातील चंदना नेटके (चोपडा), सानिया तडवी (मुक्ताईनगर), शिवानी राठोड (धुळे), पोपटी वसावे (धुळे), वैष्णवी ढोले (धडगाव), विशाखा गुजराथी (शहादा), शारदा रामराजे, (शहादा), दृष्टी जावरे (शहादा), सिमा वसावे (तळोदा), मोगरा वळवी (तळोदा), प्राजक्ता पाटील (पाळधी,जळगाव) यावेळी प्रभारी विद्यार्थी विकास संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन खेमराज पाटील यांनी तर आभार प्रा. के.एफ. पवार यांनी मानले.

उद्घाटना नंतरच्या सत्रात जुही पेठे यांचे बीज भाषण झाले. या महोत्सवात विषय तज्ञ म्हणून डॉ. निशिकांत काळे (अध्यक्ष, नेचर अँड कन्झर्वेशन सोसायटी, अमरावती), श्री. संजय पाटील (BAIF Development Research Foundation, पुणे) तसेच डॉ. सुधाकर कुर्हाडे (माजी अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना) यांनी मार्गदर्शन केले.

या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी अधिसभा सदस्य रामसिंग वळवी, डॉ जयंत उत्तरवार, केदारनाथ कवडीवाले, चेतना नन्नवरे, मानव विद्या प्रशाळेतील शिक्षक यांनी परीश्रम घेतले. यावेळी अधिसभा सदस्य स्वप्नाली काळे, डॉ. विशाल पराते, डॉ. राम भावसार यांच्यासह राज्यभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी, पर्यावरण अभ्यासक, आदिवासी प्रतिनिधी तसेच निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी आहेत. महोत्सवाची प्रमुख वैशिष्ट्ये जैवविविधता व निसर्ग संवर्धन विषयक तांत्रिक सत्रे व तज्ञांचे मार्गदर्शन, संशोधन पेपर सादरीकरण व शैक्षणिक सुसंवाद, क्षेत्रभेट (Field Visit), "सातपुड्याची लोकधारा" अंतर्गत आदिवासी पारंपरिक नृत्य सादरीकरण अशी आहेत.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २७ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता